# महिला कला वाणिज्य महाविद्यालय, चांदुर रेल्वे

## मराठी विभाग

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी , अमरावती द्वारा महिला कला - वाणिज्य महाविद्यालय , चांदूर रेल्वे या महाविद्यालयाची स्थापना सन 1991 मध्ये झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून उत्तरोत्तर या महाविद्यालयाची भरभराट होत गेली. पदवी अभ्यासक्रमापासून सुरू झालेल्या या महाविद्यालयात पुढे मराठी विषयात पदव्युत्तर शिक्षण विभाग सुरू करण्यात आला.

मराठी विषयात पदव्युत्तर शिक्षण विभाग सुरू झाल्यानंतर मोठ्याप्रमाणात विद्यार्थिनींनी 'मराठी' या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. काही विद्यार्थिनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून प्रावीण्य श्रेणी घेऊन उत्तीर्ण झाल्या. विभागामध्ये उच्च विद्याविभूषित प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाबरोबरच सुसज्ज असे स्वतःचे ग्रंथालय निर्माण केले आहे. विद्यार्थिनींना पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे महत्त्व लक्षात यावे या करिता विभागाच्या वतीने अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थीनींचे कविसंमेलन , चर्चासत्रे, सेमिनार, वादविवाद, निबंध स्पर्धा, लेखन व भाषण कौशल्ये इ. कार्यक्रमाबरोबरच लेखक आपल्या भेटीला कार्यक्रमाअंतर्गत नामवंत मोठ-मोठ्या लेखकांना मार्गदर्शनाकरिता आमंत्रित केले जाते. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, मराठी भाषा गौरव दिन इ. उपक्रम दरवर्षी यशस्वीपणे राबविण्यात येते.

मराठी विभागामार्फत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ , अमरावती मान्यता प्राप्त मराठी विषयाचे संशोधन केंद्र (रिसर्च सेंटर) चालविण्यात येते. बऱ्याच विद्यार्थ्यांनी या सेन्टरवरून पीएच.डी (Ph.D.) पदवी प्राप्त केली आहे.

या महाविद्यालयाचा मराठी विभाग ही एक अशी संस्था आहे , जी मराठी भाषा , साहित्य, आणि संस्कृतीचे संवर्धन आणि प्रचार प्रसार करण्यासाठी कार्य करते. या विभागाच्या माध्यमातून मराठी भाषिकांना त्यांच्या संस्कृतीशी जोडण्याचा प्रयत्न केला जातो.

मराठी विभागामध्ये साहित्य निर्मिती, सांस्कृतिक कार्यक्रम, आणि समाजोपयोगी कामे यांचा समावेश आहे. या विभागाच्या माध्यमातून विविध साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते , ज्यामध्ये लेखक, कवी, आणि साहित्यिकांना त्यांच्या कार्यासाठी गौरवण्यात येते. मराठी नाट्य , संगीत, आणि नृत्य यांच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, ज्यामुळे मराठी संस्कृतीचे प्रदर्शन होते.

मराठी विभागाच्या भविष्यातील योजनांमध्ये नवीन प्रकल्प , कार्यक्रम, आणि उपक्रम यांचा समावेश आहे. या विभागाच्या माध्यमातून मराठी साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन आणि प्रचार करण्यासाठी नवीन उपक्रम राबवले जातील. या विभागाच्या माध्यमातून मराठी भाषिकांना त्यांच्या संस्कृतीशी जोडण्याचा प्रयत्न केला जाईल.